लोकमत
अकोला, मंगळवार, दि. १४ मे २०२४

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, अकोला

## पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय ता. जि. बुलढाणा यांनी त्यांच्या प्रस्तावित २१ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याबाबत मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्लीचे १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिनियमान्वये व ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीस अनुसरून सदर जनसुनावणी पर्यावरणविषयक बाबींबाबत घेण्यात येत असुन सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवासी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी टीका-टिप्पणी, अभिप्राय किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरूपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक, सुचना, विचार, टीका-टिप्पणी, अभिप्राय तसेच आक्षेप ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर नोंदविण्यात याव्यात किंवा या कार्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावेत.

**उप-प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**अळशी प्लॉट, हुतात्मा स्मारकाच्या समोर,**
**नेहरू पार्क चौक, अकोला - 444001**
**फोन नं. 0724-2402344**
**email - sroakola@mpcb.gov.in**
**dmobul@gmail.com**

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

**दिनांक - १९/०६/२०२४**
**वेळ - दुपारी १२.०० वाजता**
**स्थळ - जिल्हाधिकारी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा.**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - 400022
2. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - 444606
3. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अळशी प्लॉट, हुतात्मा स्मारकाच्या समोर, नेहरू पार्क चौक, अकोला - 444001
4. जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा, जिल्हा परिषद, बुलढाणा, जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा.
5. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व उप-विभागीय कार्यालये, सर्व तहसिल कार्यालये व ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामपंचायत टाकरखेड भागीले व देऊळगाव माही, दिग्रस बु. ता. देऊळगाव राजा, ग्रामपंचायत पिंपळगाव कुडा व तडशिवणी, देवखेड-पिंपळगाव कुडा-लिंगा, साथेगाव, दुसरबिड, निमगाव यावल, राहेरी खुर्द, ता. सिंदखेड राजा, ग्रामपंचायत माहुली अ, माहुली ब, ता. जळगाव जामोद, ग्रामपंचायत खाटखेड, भस्तान, कठोरा, सगोडा ता. शेगाव, ग्रामपंचायत खिरोडा, भोन, पातुर्डा, टाकळी पम्प, काकनवाडा बु., ता. संग्रामपुर, ग्रामपंचायत पातोंडा, पलसोडा, जिगांव, टाकळी वटपाल, ता. नांदुरा, ग्रामपंचायत भुमराला, किनगाव जटाटु, ता. लोणार, जि. बुलढाणा.

सदर जनसुनावणी दिनांक १९/०६/२०२४ रोजी जिल्हाधिकारी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे रेतीघाटनिहाय घेण्यात येईल.

**स्वा/-**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र. नि. मंडळ, अकोला**
**तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**